सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
गृह विभाग




दुरध्वनी क्र. ०२२-२५२२९३०३
Email ID-dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com

पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - ६ यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग, चेंबुर, मुंबई-४०००७१

---

# प्रेस नोट

( दि.०१/१०/२०२६)
(शिवाजीनगर पोलीस ठाणे)

## खुनाच्या गुन्ह्यातील ०८ वर्षापासुन पाहीजे आरोपीस शिवाजीनगर पोलिसांनी केली अटक

शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गु.र.न.१०२/२०१८ कलम ३०२, ३४ भा.दं.वि. अन्वये दाखल गुन्ह्यातील आरोपी नामे सलवातुला अब्दुल कयुम शेख वय ३० वर्षे, हा गुन्हा घडल्यापासुन स्वतःची अटक टाळण्यासाठी फरार झालेला होता, व स्वतःचे अस्तित्व लपवुन राहत होता. सदर आरोपीचा शोध घेण्यासाठी शिवाजीनगर पोलीसांकडुन सातत्याने प्रयत्न करण्यात येत होते. नमुद आरोपी सलवातुला अब्दुल कयुम शेख हा दीर्घकाळापासून पोलिसांना गुंगारा देत होता.

विश्वसनिय सुत्रापासुन गुप्त माहीती प्राप्त झाली की, नमुद आरोपी हा गुजरात राज्यात टायर पंचरच्या दुकानावर स्वतःची ओळख लपवुन राहत आहे, मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस पथकाने मोबाईल क्रंमाकाचे सीडीआर चे तांत्रिक विश्लेषण व मिळालेल्या माहीती यांची सांगड घालुन सदर आरोपी सध्या गुजरात राज्यात कुठे राहत असावा त्याचे अस्तित्वाच्या ठिकाणाची निश्चिती केली, गुजरात राज्यात भरुच परिसरात सदर आरोपी हा राहत असल्याने वरिष्ठांच्या परवानगीने आरोपी शोधकामी तपासपथक गुजरात राज्यात रवाना झाले होते, स्थानिक पोलीसांची मदत घेवुन सदर ठिकाणी योग्य नियोजन करुन सापळा रचून आरोपी सलवातुला अब्दुल कयुम शेख यास ताब्यात घेऊन अटक केली, आरोपीस मा.न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. शिवाजीनगर पोलीसांनी दिर्घकाळापासुन खुनाच्या गुन्ह्यातील पाहीजे असलेल्या आरोपीस अटक करुन त्यास न्यायालयीन प्रक्रियेसमोर आणले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगीरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त का. व सु श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त पुर्व परिमंडळ ०१ समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त देवनार विभाग कलिम शेख, प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदिप पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि नंदुलाल पाटील, सपोनि रमेश हिरालाल चव्हाण, पोउपनि संदिप पाटील, पोलीस हवालदार महेश बाळु घारे, पोशि रोहीत बाढ, राहुल शशिकांत सुतार, शंकर पुनाजी तिटकारे, सुरज तानाजी डांगे, संदिप अंकुश मोहीते, तांत्रिक मदत पोशि आकाश शेडगे व रोहीत पाटील यांनी केली आहे.

***